ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे •अंक ३०९ • मंगळवार दि.८ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## विष्णुपुरी प्रकल्पात ७८.११ दलघमी पाणी साठा

नांदेड/प्रतिनिधी-डॉ.शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पात ७८.११ पाणी साठा आहे. त्यामुळे आगामी काळात नांदेड शहराला पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण होवू शकतो. पावसाळ्याचे तीन महिने संपले असून जिल्ह्यात समाधानकारक पाऊस अद्याप पर्यंत झालेला नाही. यंदा विष्णुपुरी प्रकल्प पूर्णपणे भरला गेला नाही. मराठवाड्यात पावसाने दडी मारल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. विष्णुपुरी प्रकल्पात ९३.२७ टक्के पाणी साठा उपलब्ध आहे. दि.८ सप्टेंबर पर्यंत प्रकल्पातील पाण्याची पातळी ३५४.६५ एवढी होती.

## राज्य सरकारचे शिष्टमंडळ कुठेही जाणार नाही-विखे पाटील

### सरकार-जरांगे संघर्षाला नवे वळण मिळण्याची शक्यता;जरांगेंची प्रकृती रात्री बिघडली,उपोषणावर ठाम



मुंबई/प्रतिनिधी- मराठा आरक्षणा संदर्भात राज्य शासनाने आवश्यक तेवढे पाऊले उचलली आहेत. त्यामुळे आता राज्य शासनाचे शिष्टमंडळ जरांगे पाटलांच्या भेटीस जाणार नाही, अशी भूमीका महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडल्याने १२ सप्टेंबरपूर्वीच व्यक्त केली जात आहे. विखे पाटलांच्या भूमीकेनंतर सरकार-जरांगे संघर्षाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज अकरावा दिवस आहे. काल रात्री त्यांची प्रकृती अचानक बिघडली होती. त्यानंतर आ.प्रसाद लाड, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह मंत्र्यांनी जरांगे यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. या चर्चेनंतर जरांगे यांनी बंद केलेले वैद्यकीय उपचार पुन्हा सुरू केले. त्यामुळे सरकारकडून आज पुन्हा चर्चेचा प्रयत्न होईल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. मात्र, विखे पाटील यांच्या वक्तव्याने या शक्यतेला पूर्णविराम मिळाला आहे. शासनाने आवश्यक ते सर्व निर्णय घेतले आहेत. आमच्याकडे उपलब्ध असलेले पर्याय करून झाले आहेत. आता या निर्णयाला जरांगे पाटील यांनी प्रतिसाद द्यावा, असे विखे पाटील यांनी ठणकावून सांगितले.मराठा-कुणबी नोंदींच्या मुद्द्यावर सरकारने ५८ लाख नोंदी ग्रामपंचायतींकडे प्रसिद्ध केल्याचा दावा त्यांनी केला. नागरिकांकडून ५२० अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी २४० अर्ज दाखले काढण्यासंदर्भातील आहेत. वंशावळ किंवा अन्य पुरावे उपलब्ध झाल्यास त्यानुसार दाखले देण्याची प्रक्रिया सुरू राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.सरकार एक पाऊल पुढे आले आहे. त्यामुळे आता जरांगे पाटील यांनीही सरकारची भूमिका समजून घ्यावी, असे विखे पाटील यांनी म्हटले. प्रश्न सुटला पाहिजे, ही सरकारची भूमिका आहे. मात्र, राजकारण आणून प्रश्न अधिक चिघळवायचा नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, विखे पाटील यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी सुरू असल्याचा दावा करत त्यांनी फडणवीस-शिंदे सरकारवरील टीकेलाही प्रत्युत्तर दिले.सरकारने शिष्टमंडळाची भेटच नाकारल्याने आता जरांगे पाटील कोणती भूमिका घेतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अकराव्या दिवशी उपोषण सुरू असताना सरकारच्या कठोर भूमिकेमुळे आरक्षणाचा तिढा अधिकच गंभीर बनला आहे..

## नातं पदापेक्षा मोठं...म्हणूनच माजी उपराष्ट्रपती पोहोचले वझरा गावात

### कर्मचाऱ्यासोबत कौटुंबिक नात्याची जपणूक;सहपत्नीक धनखड यांची सांत्वनपर भेट



सरफराज दोसानी

माहूर:मोठमोठी पदे, मान-सन्मान आणि राजकीय प्रतिष्ठा यापलीकडेही काही नाती मनाला जोडलेली असतात. अशाच एका जिव्हाळ्याच्या नात्याची प्रचिती किनवट तालुक्यातील आदिवासीबहुल वझरा (बु.) या छोट्याशा गावाने मंगळवारी अनुभवली. देशाच्या उपराष्ट्रपतीपदाची जबाबदारी सांभाळलेले माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी एका कर्मचाऱ्यासोबत निर्माण झालेल्या कौटुंबिक संबंधांची जपणूक करत सहपत्नीक वझरा येथे येऊन येईलवाड कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली.

दिवंगत वनपरिक्षेत्र अधिकारी जगन्नाथ बळीराम येईलवाड यांच्या निधनाचे दुःख मनात घेऊन धनखड यांनी थेट त्यांच्या कुटुंबीयांच्या घरी जाऊन भेट दिली. ३० जुलै रोजी जगन्नाथ येईलवाड यांचे निधन झाले होते. त्यांचे पुत्र तथा पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगचे पोलीस अधीक्षक आयपीएस श्रीकांत येईलवाड यांच्या कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात सहभागी होत धनखड यांनी तब्बल दोन तास कुटुंबीयांशी संवाद साधला. ही भेट एका आप्ताच्या दुःखात दुसरा आप्त उभा राहावा, अशी माणुसकीची भेट होती. पदाचा प्रोटोकॉल बाजूला ठेवून धनखड यांनी येईलवाड कुटुंबीयांना दिलेला वेळ आणि आधार उपस्थितांसाठी भावनिक क्षण ठरला. दिवंगत जगन्नाथ येईलवाड यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी त्यांच्या पत्नी डॉ. सुदेश धनखड यांचीही उपस्थिती होती. या भेटीनंतर आयपीएस अधिकारी श्रीकांत येईलवाड भावुक झाले. मी आज जे काही आहे, ते केवळ माझ्या वडिलांच्या संस्कारांमुळेच आहे. त्यांचा आशीर्वाद नेहमीच माझ्या पाठीशी राहील. या शब्दांत त्यांनी वडिलांच्या आठवणींना उजाळा दिला. एका बाजूला वडिलांच्या आठवणींनी भरून आलेले डोळे आणि दुसऱ्या बाजूला दुःखाच्या क्षणी आधार देण्यासाठी स्वतः माजी उपराष्ट्रपतींची उपस्थिती, या प्रसंगाने वझऱ्याच्या मातीतील माणुसकीचे दर्शन घडविले. किनवट-माहूरचे आ.भीमराव केराम यांनीही येईलवाड कुटुंबीयांची भेट घेऊन दिवंगत जगन्नाथ येईलवाड यांना श्रद्धांजली अर्पण केली. माजी उपराष्ट्रपतींच्या आगमनामुळे वझरा गावात सकाळपासूनच प्रशासकीय हालचालींना वेग आला होता. कडेकोट पोलीस बंदोबस्त, आरोग्य विभाग, महसूल प्रशासन, अग्निशमन दल यांसह विविध विभागांची उपस्थिती होती. मात्र, या सर्व प्रोटोकॉलच्या पलीकडे धनखड यांच्या भेटीने वझऱ्याला एक वेगळीच ओळख मिळाली. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदांपैकी एक पद भूषविलेल्या व्यक्तीने एका छोट्याशा आदिवासी गावातील कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होण्यासाठी स्वतःहून दिलेली ही भेट...पदापेक्षा नात्यांना आणि माणुसकीला मोठे मानणारा संदेश देऊन गेली.

## शालेय पोषण आहार कर्मचारी युनियनचे जि.प.कार्यालयासमोर आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-शालेय पोषण आहार कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आयटक प्रणित महाराष्ट्र राज्य शालेय पोषण आहार कर्मचारी युनियनच्यावतीने आज (मंगळवार) जि.प.कार्यालयाच्या गेट समोर आंदोलन करण्यात आले.

नांदेड जिल्ह्यातील शालेय पोषण आहार कामगारांचे तीन महिन्यांचे मानधन व चार महिन्यांचे इंधन देयके तात्काळ वाटप करावे, जिल्ह्यातील जि.प. च्या शाळेवर करारनामा चुकीच्या पद्धतीने घेतला जात आहे, चुकीचा करारनामा घेणाऱ्या संबंधीतांवर कार्यवाही करावी, शासनाच्या नियमाप्रमाणे शालेय पोषण आहार कामगारांकडून आठ कामे दिली असून तीच कामे करुन घ्यावीत, अतिरिक्त कामे लावणाऱ्या मुख्याध्यापकांवर कारवाई करावी, जिल्ह्यातील जि.प. शाळांना दोन बँक खाती आहेत, शाळेच्यांच खात्यातून व्यवहार करण्यात यावा, इतर खात्यातून व्यवहार बंद करावेत, इंधन, भाजीपाला रक्कम मुख्याध्यापकाच्या खात्यावर जमा झाल्यानंतर दहा दिवसामध्ये स्वयंपाकीयांना द्यावेत व इतर मागण्यांसाठी आयटक प्रणित महाराष्ट्र राज्य शालेय पोषण आहार कर्मचारी युनियनच्यावतीने जि.प.कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. कामगारांनी जि.प.च्या मुख्य गेट समोरच काहीकाळ आंदोलन केल्याने जि.प.कार्यालयात वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. त्यानंतर वजिराबाद पोलीस स्टेशनचे एक पथक आंदोलनस्थळी दाखल झाले. त्यांनी



कामगारांची समजूत काढल्यानंतर कामगारांनी मुख्य प्रवेशद्वारा जवळील आंदोलन बाजूला करुन प्रवेशद्वार वाहतुकीसाठी खुले करुन दिले. या आंदोलनात राज्य महासचिव कॉ.विनोद झोडगे, राज्याध्यक्ष कॉ.शामजी काळे, राज्य उपाध्यक्ष कॉ.मुगाजी बुरुड, जिल्हाध्यक्ष कॉ.नामदेव शिंदे, जिल्हा सरचिटणीस शेवंताबाई काकडे यांच्यासह शालेय पोषण आहार कामगार सहभागी झाले होते.

## कुणबी प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ करा-न्या.संदीप शिंदे

छत्रपती संभाजीनगर:उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ व संबंधित पुराव्यांची नियमानुसार पडताळणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही सुलभ व पारदर्शकपणे करावी, असे मार्गदर्शन न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांनी आज केले.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतच्या कार्यपद्धतीचा आढावा घेण्यासाठी न्यायमूर्ती श्री.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली




दूरदृष्य प्रणालीद्वारे बैठक झाली. विभागीय आयुक्त कार्यालयातून न्यायमूर्ती शिंदे यांनी बैठकीस मार्गदर्शन केले.यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, सह आयुक्त मंजूषा मिसकर, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अध्यक्ष व सदस्य दूरदृष्यप्रणाली द्वारे उपस्थित होते.बैठकीत उपलब्ध कागदोपत्री नोंदी, वंशावळ पडताळणी, प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती तसेच स्थानिक पातळीवरील यंत्रणांच्या भूमिकेचा आढावा घेण्यात आला. उपलब्ध नोंदींच्या आधारे पात्र प्रकरणांची कार्यवाही नियमानुसार करण्याबाबत न्यायमूर्ती शिंदे पान ४ वर

## पावसाचा लांबलेला खंड;७६ हजार हेक्टरवरील पिकांना पावसाची प्रतीक्षा

मुखेड/प्रतिनिधी-पावसाळ्याचा अंतिम टप्पा सुरू असतानाही मुखेड तालुक्यात पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांची अवस्था चिंताजनक बनली आहे. सुरुवातीच्या पावसावर पेरणी झाल्यानंतर दीर्घकाळ पाऊस न झाल्याने शिवारातील पिके पाण्यासाठी तहानलेली असून, अनेक ठिकाणी पिकांची वाढ खुंटली आहे.

तालुक्यात यंदा मोठ्या क्षेत्रावर खरीप पिकांची लागवड करण्यात आली आहे. त्यामध्ये सोयाबीनचे क्षेत्र सर्वाधिक ५४ हजार ३५८ हेक्टर, तर कापूस ९ हजार १५८, तूर ७ हजार ७९९, मूग २ हजार ८६ आणि उडीद १ हजार ९३२ हेक्टर क्षेत्रावर आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडाचा सर्वाधिक फटका सोयाबीन पिकाला बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पाऊस गायब झाल्याने शेतकरी उपलब्ध विहिरी व बोअरवेलच्या पाण्यावर पिके वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र सिंचनासाठी लागणारी वीज, डिझेल, मजुरी आणि इतर खर्च वाढल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात मोठी भर पडत आहे. काही भागात पाण्याची उपलब्धता मर्यादित असल्याने सर्वच क्षेत्राला पाणी देणे शक्य होत नाही.गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढल्याने शेतातील पिकांवर ताण वाढला आहे. हिरवेगार दिसणारे पीक आता पिवळसर पडू लागल्याचे चित्र अनेक शिवारांत दिसत आहे. निर्णायक अवस्थेत पावसाची गरज असताना पाऊस लांबल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा मावळू लागल्या आहेत.खरीप पिकांचे उत्पादन धोक्यात आल्याने त्याचा परिणाम ग्रामीण अर्थ व्यवस्थेवरही होण्याची शक्यता आहे. गणेशोत्सव, नवरात्र, दसरा आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या हातात पैसा येण्याची अपेक्षा असते. मात्र यंदा शेतीचे उत्पन्नच संकटात आल्याने सणासुदीचा खर्च कसा भागवायचा, हा प्रश्न अनेक कुटुंबांसमोर उभा राहिला आहे.आता पावसाचा एक दमदार टप्पा झाला तरच खरीप पिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांसह संपूर्ण ग्रामीण भागाचे लक्ष आभाळाकडे लागले आहे.

## माहूर तालुक्यात पावसाच्या खंडाने बैल पोळ्याच्या उत्साहावर पाणी...

### शेतकऱ्यांच्या खिशाला झळ;बाजारपेठेत उलाढाल मंदावली,सजावटीच्या दरात २० ते ३० टक्के वाढ



माहूर/प्रतिनिधी-दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने यंदाच्या बैलपोळा सणावरही दुष्काळसदृश परिस्थितीचे सावट आले आहे. पोळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही माहूरच्या आठवडी बाजारपेठेत दरवर्षी सोमवारी दिसणारी लगबग आणि उत्साह यंदा जाणवला नाही. पावसाअभावी खरीप पिके संकटात सापडल्याने शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसून पोळ्याच्या खरेदीवरही त्याचा थेट परिणाम झाला आहे. त्यामुळे बाजारपेठेतील उलाढाल मंदावल्याचे चित्र आहे.

गुरुवार, १० सप्टेंबर रोजी बैलपोळा साजरा होणार असल्याने शहरातील बाजारात बैलांच्या सजावटीचे साहित्य मोठ्या प्रमाणात दाखल झाले आहे. कासरे, दोरखंड, शिंगांना लावण्यासाठी रंगीबेरंगी गोंडे, माळा, झुली, गजरे, घागरमाळ, शेंबी, माथवठी, मोरखी, मानाचे चवर, घोगर, लोकरीचा केसर, छंबी, रंग, गेरू, नारळ, फुगे आदी साहित्य विक्रीसाठी मांडण्यात आले होते. मात्र, ग्राहकांची संख्या कमी असल्याने विक्रेत्यांना दिवसभर गिऱ्हाईकांच्या प्रतीक्षेत बसावे लागले.गतवर्षी पोळ्याच्या काळात बाजारात खरेदीसाठी मोठी गर्दी होत होती. यंदा मात्र ऑगस्ट महिन्यात पावसाने दिलेल्या मोठ्या खंडामुळे परिस्थिती बदलली आहे. जुलै अखेरपासून पावसाने मोठी उघडीप दिल्याने सोयाबीन, कापूस, तूर, मका यांसारखी खरीप पिके पाण्याअभावी करपण्याच्या मार्गावर आहेत. ऐन वाढीच्या अवस्थेत पिकांना पाण्याची गरज असताना पाऊस लांबल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. काही भागांत पिकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पिके माना टाकूलागली आहेत. आगामी काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास खरीप उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.खरीप हंगामाची चिंता कायम असतानाच रब्बी हंगामाचीही काळजी शेतकऱ्यांना सतावत आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने रब्बी पिकांच्या पेरणीसाठी पुरेसा पाऊस होणे आवश्यक आहे. त्यामुळे पावसाने आणखी दडी मारल्यास खरीपसोबतच रब्बी हंगामही अडचणीत येण्याची शक्यता आहे. पोळा हा बळीराजासाठी केवळ सण नसून वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. मात्र, यंदा शेतकऱ्यांच्या आनंदावर आर्थिक संकटाची छाया आहे. त्यातच बैलांच्या सजावटीच्या साहित्याच्या दरात गतवर्षीच्या तुलनेत तब्बल २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे अनेक शेतकरी नवीन साहित्य खरेदी करण्याऐवजी गतवर्षीचेच साहित्य वापरण्यास पसंती देत आहेत. शेतीच्या पान ४ वर

## राज्यात उष्ण-दमट हवामानाचा अंदाज

मुंबई/प्रतिनिधी-राज्यात मान्सूनचा जोर पुन्हा ओसरला असून बहुतांश भागात पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे पुढील काही दिवस राज्यात प्रामुख्याने उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पावसाची तीव्रता कमी झाल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

मध्य प्रदेश आणि परिसरात कमी दाबाचे क्षेत्र सक्रिय असले तरी त्याचा राज्यातील पावसावर फारसा प्रभाव दिसून येत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील बहुतांश भागात पावसाच्या जोरदार सरींची शक्यता कमी झाली आहे. काही भागात मात्र ढगाळ वातावरणासह तुरळक हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड या उत्तर कोकणातील जिल्ह्यांसह दक्षिण कोकण-गोवा परिसरात काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होऊ शकतो. मात्र, राज्यातील अन्य भागांत पावसाची शक्यता तुलनेने कमी राहणार आहे. पुणे शहरासह घाटमाथ्याच्या परिसरातही पावसाचा जोर कमी झाला आहे. काही ठिकाणी हलक्या सरी पडण्याची शक्यता असली तरी मोठ्या पावसाचा अंदाज नाही. विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.दरम्यान, ऑगस्ट महिन्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने खरीप पिकांवर त्याचा परिणाम होण्याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. सोयाबीन, कापूस, तूर यांसह अन्य पिकांसाठी आगामी काळातील पाऊस महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे.

# डीजेपेक्षाही मोठा आवाज;पण व्यवस्था कमालीची बहिरी

**रविवारी छत्रपती संभाजीनगरहून नांदेडकडे येण्यासाठी रेल्वेत बसलो होतो. माझ्या मागच्या सीटवर साधारण ३०-३२ वर्षांचा एक तरुण बसला होता. जालना स्टेशन आले आणि त्याच्या मोबाईलवर फोन आला. त्याचे बोलणे ऐकण्याचा माझा हेतू नव्हता; पण काही वाक्ये कानावर पडली आणि मन सुन्न झाले. तो मित्राला सांगत होता, ''ही शेवटची संधी म्हणून खूप अभ्यास केला. पण आता एमपीएससीचा पेपरही फुटल्याची चर्चा आहे. तिकिटाला पैसे नव्हते म्हणून ७० रुपयांत आलो. गावात अनेकांचे पैसे द्यायचे आहेत. सारखे कधी देतोस, म्हणून विचारत आहेत. आता कोतवालची परीक्षा आहे, ती एकदा देऊन पाहतो. त्यानंतर माझं संपलं...'' तो तरुण परभणीला उतरला; पण त्याचे ते शब्द मनातच राहिले. मुलाला शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगरला घेऊन गेलो होतो. परतीच्या प्रवासात मात्र स्वतःलाच प्रश्न पडला, आपण मुलांना एवढ्या जीवापाड मेहनतीने शिकवतो तरी कशासाठी? हा प्रश्न त्या एका तरुणाचा नाही. तो महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थ्यांचा आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी केवळ एखादा पेपर देत नसतो; तो आपल्या आयुष्याची काही वर्षे त्या परीक्षेवर पणाला लावत असतो. घरापासून दूर राहतो, महागडी पुस्तके आणि क्लासेसचा खर्च करतो, अनेकदा कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही अभ्यास सुरू ठेवतो. अशा विद्यार्थ्याला परीक्षेपूर्वी प्रश्नपत्रिका बाहेर गेल्याची बातमी समजली तर त्याच्यासाठी हा केवळ गैरप्रकार राहत नाही; तो त्याच्या संपूर्ण मेहनतीवरचा घाला असतो. पेपरफुटीच्या प्रकरणात सर्वांत गंभीर प्रश्न हा ''पेपर फुटला का?'' एवढाच नाही. प्रश्न आहे, तो फुटूच कसा शकला? प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून छपाईपर्यंत, सुरक्षित साठवणुकीपासून परीक्षा केंद्रापर्यंत आणि वितरणापासून परीक्षा सुरू होईपर्यंत अनेक स्तरांवर गोपनीयता आणि सुरक्षा व्यवस्था असते. या साखळीत कुठे त्रुटी झाली, तर त्याची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. ''आमचे पेपर फुटू शकत नाहीत'' असे सांगून जबाबदारी संपत नाही. उलट, व्यवस्था अभेद्य असेल तर तिची अभेद्यता तपासून दाखवण्याची जबाबदारी प्रशासनाचीच आहे. विद्यार्थ्यांनी संशय व्यक्त केला की; प्रथम संशय विद्यार्थ्यांवरच का घेतला जातो? तक्रारदाराने पुरावे आणावेत आणि प्रशासनाने त्यानंतर हालचाल करावी, ही भूमिका बदलली पाहिजे. परीक्षा घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे; परीक्षा निष्पक्षपणे घेणे ही त्याची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे. म्हणून आता केवळ चौकशीच्या घोषणा नकोत; ठोस निर्णय हवेत. शासनाने तातडीने पेपरफुटीविरोधी स्वतंत्र आणि स्वायत्त परीक्षा सुरक्षा प्राधिकरण स्थापन करावे. प्रश्नपत्रिका तयार होण्यापासून निकाल जाहीर होईपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेचे सुरक्षा ऑडिट या प्राधिकरणामार्फत करावे. प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या, छापणाऱ्या, वाहतूक करणाऱ्या आणि सुरक्षित ठेवणाऱ्या प्रत्येक टप्प्यावर जबाबदारी निश्चित करणारी डिजिटल लॉग व्यवस्था आणि सीलबंद ट्रॅकिंग प्रणाली अनिवार्य करावी. कोणत्या टप्प्यावर कोणाच्या ताब्यात प्रश्नपत्रिका होती, याचा नोंदवहीसह डिजिटल मागोवा उपलब्ध असावा. परीक्षेपूर्वी पेपरफुटीचा विश्वसनीय आरोप किंवा ठोस पुरावा समोर आल्यास, २४ ते ४८ तासांत प्राथमिक चौकशी पूर्ण करून तिचा निष्कर्ष विद्यार्थ्यांसमोर मांडण्याची कालमर्यादा निश्चित करावी. दोष आढळल्यास परीक्षा रद्द करण्याचा किंवा पुनर्परीक्षा घेण्याचा निर्णय तातडीने घ्यावा. पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द झाली तर त्याची किंमत विद्यार्थ्यांनी का मोजावी? म्हणून परीक्षा रद्द झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील परीक्षेसाठी शुल्कमाफी, वयोमर्यादेत सवलत आणि आवश्यक असल्यास आर्थिक भरपाई देण्याचे स्पष्ट धोरण शासनाने जाहीर करावे. तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांना किंवा पुरावे देणाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याऐवजी व्हिसलब्लोअर संरक्षण व्यवस्था निर्माण करावी. तक्रारदाराची ओळख गोपनीय ठेवून तक्रारीची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे पेपरफुटी सिद्ध झाल्यास केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून प्रकरण बंद करू नये. ज्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली परीक्षा व्यवस्था होती, त्यांचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. निष्काळजीपणा, संगनमत किंवा जाणीवपूर्वक गोपनीयता भंग सिद्ध झाल्यास कठोर फौजदारी आणि प्रशासकीय कारवाई झाली पाहिजे. ही मागणी केवळ विद्यार्थ्यांची नाही; ती महाराष्ट्राच्या भवितव्याची आहे. रविवारी पुण्यात डीजेविरोधात मोठा मोर्चा झाला. सोमवारी विद्यार्थ्यांनी एमपीएससी पेपरफुटीविरोधात रस्त्यावर उतरून आवाज बुलंद केला. डीजेचा आवाज काही तासांचा असतो; विद्यार्थ्यांचा आवाज त्यांच्या भवितव्याचा असतो. हा आवाज आता ऐकला पाहिजे. कारण प्रश्न फक्त पेपर फुटण्याचा नाही; प्रश्न आहे तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वास फुटण्याचा. डीजेपेक्षाही मोठा आवाज करून विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. आता शासन-प्रशासनाने कान उघडे ठेवून ठोस निर्णय घ्यावेत. अन्यथा उद्याचा इतिहास एवढेच लिहील विद्यार्थी ओरडत होते, पुरावे देत होते, न्याय मागत होते; पण व्यवस्था कमालीची बहिरी होती.**

# पाऊस कदाचित ऑक्सीजनवर अवलंबून असेल का?



अलिकडील काळात पाऊस पडत नाही. त्याचं कारण लोकं म्हणतात की जंगलं कमी होणं. मानवी वस्ती साकारण्यासाठी लोकांनी जंगलतोड केली. ज्याचा परिणाम आज पाऊस पडत नाही. हे खरंही आहे. पुर्वी असं नव्हतं. जंगलं भरपूर होती व हवेत ऑक्सीजन जास्त होतं. त्यामुळंच पाऊस पडत असायचा. पुर्वी आठ-आठ दिवस पावसाच्या झडी चालत असत. आता मात्र तसं नाही. मात्र विचार येतो की असं का घडलं की पावसानं आज येणं बंद केलं असावं. मग प्रश्न असा पडतो की झाडं जरी कमी झाली असली तरी ती तेवढ्या प्रमाणात कमी झालेली नाही की ज्यातून पाऊस पडूच नये.

पाऊस येण्याला कारणीभूत आहे, वाऱ्यांचं वाहणं. हा निसर्गाचा एक खेळच आहे की बाष्प असलेले वारे त्या भागातून वाहतात. समुद्राच्या पाण्याची वाफ होवून ती वाफ ज्या दिशेने वाऱ्याच्या मदतीने वाहाते. त्या त्या भागात जर उंच पर्वत असेल तर त्याला ते बाष्प अडून तेथील वातावरणाचा त्यावर परिणाम होवून पाऊस पडतो. हे जरी खरं असलं तरी असलं तरी त्याचा झाडाशी संबंध काय? असाही एक प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. यावरही लोकं म्हणतात की झाडं उंच वाढतात व त्याला हे बाष्प अडतं. ज्यातून प्रक्रिया होते व पाऊस पडतो. मग जिथं खोलगट भाग असेल, तिथंही पाऊस पडतो. तिथं तर झाडांची उंची कमी असते ना. मग बाष्प नेमकं कोणाला अडतं?

आपल्याला माहित असेलच की ज्या कोणत्या विधात्यानं सृष्टी निर्माण केली. त्या विधात्यानं सृष्टी निर्माण करतांना भेदभाव केलेला नाही. प्रत्येकालाच समान अधिकार दिला व प्रत्येकाचा विचार करुनच त्यानं ऑक्सीजन तेवढ्या प्रमाणात निर्माण केला. तो पुर्वी विपूल प्रमाणात होता. कारण झाडं जास्त प्रमाणात होती. अन पुर्वी प्रत्येक भागात झाडं जास्त होती व पाऊसही जास्त पडत होता. आताही ज्या भागात जास्त झाडं आहेत, त्याच भागात आजही पाऊस जास्त पडतो. परंतु आज आपण त्याची मात्रा आपल्याच वागणुकीनं कमी केलेली आहे. जंगल वाचवणं, अलिकडील काळात काळाची गरज आहे. कारण जंगल जर वाचलं नाही तर भविष्यात येणारी पिढीही आपलं जीवन वाचवू शकणार नाही. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही.

पावसाबद्दल सांगायचं झाल्यास यावर्षी पावसाळा लागल्याला बरेच दिवस झाले. काही ठिकाणी पूर आला व काही ठिकाणी महापूरही आला. परंतु काही भागात पावसाळा लागला की नाही, अशीच चिन्हं दिसत आहेत. एवढी उष्णता व पावसाचे प्रमाण कमी, त्यातच उन्हाळ्यासारखी रखरखीत ऊन बऱ्याच भागात आजही अनुभवावयास येते. हा पावसाळा आहे की उन्हाळा, असा प्रश्न पडतो. रात्री झोपतांना उन्हाळाच जाणवतो. असे असतांना काही ठिकाणी महापूर व पूर आलेत. त्याचं कारण काय असावं? जसं उदाहरण द्यायचं झाल्यास नेपाळचं देता येईल. नेपाळमध्ये पूर एवढा आला होता की सांगता सोय नाही. म्हटलं जातं की नेपाळमध्ये पूर हा ग्लेशिअर पिघलण्यानं आला. ग्लेशिअरचं पिघलणं. हेही उष्णता वाढण्याचाच एक प्रकार. उष्णतामान वाढलं आहे. त्याला कारणीभूत आहोत आपण. आपणच जंगलं तोडली व जंगल तोडल्यानं जमीनीची फारच मोठ्या प्रमाणावर धूप झाली. शिवाय अशा वाढलेल्या तापमानानं समुद्राच्या पाण्याची वाफ झाली आणि त्याचं बाष्पही बनलं आणि ते बाष्प थंड होवून पावसाच्या स्वरुपात खालीही आलं व तीच वाफ बर्फ बनून पडलीही. परंतु कुठं? जिथं उंच पर्वत आहेत तिथं, ते बाष्प बनून.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर

पाऊस पडण्याबद्दल लोकँसांगतात की पाण्याची वाफ बनते. ती वर जाते. ती वर गेल्यावर थंड होते व ती वाफ थंड झाली की त्याचे बाष्पाचे अर्थात बर्फांचे लहान लहान तुकडे बनतात व तेच तुकडे खाली आले व त्याला थोडी उष्णता लागली की त्याची अवस्था द्रव बनते. ज्याला आपण पाऊस म्हणतो. हे जरी बरोबर असलं तरी पाण्याच्या वाफेत ऑक्सीजन कमी प्रमाणात असतो. मात्र हायड्रोजनची मात्रा जास्त प्रमाणात असते. ती जेव्हा वर जाते. तेव्हा त्याचा संयोग वर असलेल्या ऑक्सीजनशी होतो. ज्यातून बर्फाचे पुंजके तयार होतात. ते वरुन जेव्हा खाली येतात. तेव्हा त्याचा संयोग उष्णतेशी होतो व पावसाचे कण तयार होतात. मग पाऊस पडतो. या साऱ्याच गोष्टी बरोबर असल्या तरी पाऊस पडण्याला मुख्य जबाबदार घटक आहे, तो म्हणजे ऑक्सीजन. ऑक्सीजन नसेल तर जिथं मानव व पशूपक्षी जीवंत राहू शकत नाही. तिथं पाऊस कसा पडू शकतो? मुख्य म्हणजे पावसाच्या येण्यालाही ऑक्सीजन जबाबदार असू शकतो. असं वाटतं. कारण झाडं ही श्वास घेतांना व अन्न निर्माण करतांना अर्थात प्रकाशसंश्लेषण क्रिया करतांना हवेतील कार्बनडायऑक्साईड शोषून घेतात व उत्सर्जन म्हणून ऑक्सीजन हवेत सोडतात. त्यामुळंच जिथं झाडं जास्त असेल, तिथंच पाऊस पडतो. इतर भागात कमी पडतो. याचाच अर्थ असा की पाऊस येण्याला जबाबदार घटक जो कोणता असेल, तो ऑक्सीजनच असू शकतो. मात्र त्याकडे शास्त्रज्ञांचे लक्षच गेलं नसेल. असं वाटतं.

वाफेचं रासायनिक सुत्र आहे, २(एच२ओ), पाण्याचं रासायनिक सुत्र आहे, एच२ओ व बर्फ ही पाण्याचीच अवस्था. त्याचंही सुत्र आहे, एच२ओ. आता समुद्रालगतचा २(एच२ओ) अर्थात पाण्याची वाफ वर जाते. वर गेल्यावर ती वाफ तेथील थंड हवेनं थंड होवून त्याची बर्फ अवस्था बनते. अगदी लहान लहान बर्फाचे तुकडे. ते परत खाली येवू लागतात. ते एच२ओ चे तुकडे जमीनीलगत आले, की ते डोंगर किंवा पर्वतीय भागात बर्फाच्या रुपात पडतात. ते पडतात फक्त बर्फाच्या पुंजकाच्या रुपानं. परंतु जर त्याला थोडीशी उष्णता लागली तर ते पाण्याच्या रुपातही पडतात. परंतु ही क्रिया डोंगर वा पर्वतालगत घडते. याचाच अर्थ असा की त्या बर्फाच्या पुंजक्याची पाणी अवस्था बनवायची असेल वा बर्फाला इतर भागात पडायचं असेल तर एच२ हा विपूल प्रमाणात लागतोच. ज्याला हेलिअम असंही म्हणतात. हेलिअम याचा अर्थ हायड्रोजन या वायूची उच्चत्तम अवस्था. म्हणजेच वरुन खाली येणाऱ्या एच२ओ चा खाली आल्यानंतर (एच२) व (ओ) या वेगवेगळ्या वातावरणातील मुलद्रव्याशी संयोग होतो व मूळ रुपात असलेल्या पाण्याच्या बर्फाळ अवस्थेचं विपूल अशा पावसाच्या पाण्यात रुपांतरण होतं व विपूल प्रमाणात पाऊस येतं. ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. याचाच अर्थ असा की हवेत, ज्या भागात जेवढा ऑक्सीजन असेल, त्या त्या भागात तेवढ्या जास्त प्रमाणात पाऊस येवू शकतो. यासाठीच झाडं विपूल प्रमाणात असणं अतिशय गरजेचं आहे. कारण झाडंच ऑक्सीजन विपूल प्रमाणात निर्माण करु शकतात. ऑक्सीजन हा घटक झाडाशिवाय इतर कोणीही निर्माण करु शकत नाही.

एच२ओ चा एच२ शी व एच२ओ चा ओ शी संयोग होणं गरजेचं असते. जे ऑक्सीजन झाडातून वातावरणात प्रवाहीत होत असतं. मात्र अलिकडील काळात जंगलं नसल्यानं ऑक्सीजनची मात्राच जमीनीलगत कमी आहे. त्यातच जो ऑक्सीजन वातावरणात आहे. त्याचा वापर प्राणी, पशूपक्षी करीत असतात. अशातच वातावरणातील ऑक्सीजन कमी होतो व ऑक्सीजन कमी झाला की पाण्याचा ऑक्सीजनशी संयोग होत नाही व पाऊस इतर भागात पडत नाही. याचाच अर्थ असा की पाऊसही पडायला ऑक्सीजन हवा असू शकतो. जो जंगलं तोडल्यानं कमी झालाय.

माणसानं जंगलं तोडली. त्याचा दुष्परिणाम असा झाला की आता जंगलं नसल्यानं जंगलातील प्राणी अर्थात हिंस्र प्राणी मानवी निवाऱ्याकडे येवू लागलेले आहेत. ज्यातून मानवी वस्तीला धोका निर्माण झालाय. म्हणूनच जंगलं निर्माण करणं ही काळाची गरज आहे. आपण आपला स्वार्थ सोडून जंगल निर्माण करणं गरजेचं आहे. प्रत्येकांनी एक तरी झाड लावणं, तेवढंच गरजेचं आहे. ते जर नसेल तर ऑक्सीजन निर्माण होणार नाही व ऑक्सीजन नसेल तर पाऊसही पडणार नाही. अन पाऊस पडला नाही तर एक काळ असा येईल की ज्या काळात ही सृष्टी दिसणार नाही. म्हणूनच झाडं लावणं व ऑक्सीजन निर्माण करणं गरजेचं आहे. कारण कदाचित पाऊसही ऑक्सीजनवरच अवलंबून असतो. यात शंका नाही.

# श्री गुरु गोविंदसिंघांच्या पावन भूमीत वाढती गुन्हेगारी
# नांदेडकरांच्या संयमाचा अंत पाहू नका!

श्री गुरु गोविंदसिंघांच्या पावन वास्तव्याने नांदेडची भूमी देशाच्या धार्मिक आणि ऐतिहासिक नकाशावर विशेष स्थान मिळवून आहे. शौर्य, त्याग, मानवता आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देणाऱ्या या भूमीची ओळख शांतता, श्रद्धा आणि सामाजिक सलोखा अशी असायला हवी. परंतु अलीकडच्या काळात शहरात घडणाऱ्या खून, प्राणघातक हल्ले, टोळीयुद्धे आणि अवैध शस्त्रांच्या वापराच्या घटनांमुळे नांदेडच्या कायदा-सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

मे २०२५ मध्ये प्रवीण गणेश पवार या तरुणाची चाकूने हत्या झाली. त्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये सक्षम गोविंद ताटे या युवकाची हत्या झाल्याचे वृत्त समोर आले. एप्रिल २०२६ मध्ये पावडेवाडी परिसरातील प्रताप गायकवाड यांच्या हत्येने शहर हादरले. त्याच महिन्यात कॅनॉल रोड परिसरातील हिंसक टोळी संघर्षात अर्जित सिंग, सय्यद अवेज आणि महम्मद अरबाज या तिघांचा मृत्यू झाल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. या घटनांमध्ये वापरली गेलेली धारदार शस्त्रे आणि काही प्रकरणांतील गुन्हेगारी पार्श्वभूमी हा प्रशासनासाठी विशेष चिंतेचा विषय ठरला पाहिजे.

ही नावे केवळ वर्तमानपत्रातील मथळे नाहीत. प्रत्येक नावामागे एक कुटुंब आहे, आई-वडिलांच्या अपेक्षा आहेत, भावंडांचे प्रेम आहे आणि अचानक उद्ध्वस्त झालेले आयुष्य आहे. त्यामुळे प्रत्येक गंभीर गुन्ह्यानंतर काही दिवस खळबळ उडवून देऊन पुन्हा सर्व काही पूर्वपदावर येणे हा उपाय नाही. प्रश्न आरोपी पकडण्यापुरता मर्यादित नाही गंभीर गुन्हा घडल्यानंतर आरोपीला अटक करणे आवश्यकच आहे. परंतु त्यापेक्षा महत्त्वाचा प्रश्न आहे. गुन्हेगारांच्या हातात शस्त्रे पोहोचतात कुठून? अवैध पिस्तुले, देशी बनावटीची शस्त्रे, तलवारी, चाकूकिंवा इतर घातक हत्यारे जर गुन्हेगारांच्या हातात सहज उपलब्ध होत असतील, तर शस्त्रांच्या पुरवठा साखळीवरच प्रहार करणे आवश्यक आहे. एखादे शस्त्र जप्त झाले की तपास संपला असे न मानता ते शस्त्र कोणी दिले, कुठून आले, त्यामागे कोणते नेटवर्क आहे आणि त्या नेटवर्कशी आणखी कोण जोडलेले आहेत, याचा तपास झाला पाहिजे. गुन्हेगार पकडण्यापेक्षा गुन्हेगारीचे नेटवर्क उद्ध्वस्त करणे ही खरी पोलिसी कामगिरी आहे.

**प्रतिबंधात्मक पोलिसिंग कुठे आहे?**

नांदेड शहरातील संवेदनशील भाग, पूर्वी गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्ती, टोळ्यांमधील वैमनस्य, शस्त्र बाळगणारे संशयित आणि वारंवार गुन्हे करणाऱ्या व्यक्तींवर कायद्याच्या चौकटीत सातत्याने लक्ष ठेवणे गरजेचे आहे. बीट पोलिसिंग अधिक सक्षम झाले पाहिजे. पोलिस अधिकाऱ्यांना आपल्या परिसरातील गुन्हेगारीची सामाजिक पार्श्वभूमी, संभाव्य संघर्षाचे केंद्र आणि सक्रिय गुन्हेगारी गटांची माहिती असली पाहिजे. केवळ गुन्हा घडल्यानंतर घटनास्थळी पोहोचणारी यंत्रणा नको; गुन्हा घडण्यापूर्वी त्याची चाहूल घेणारी यंत्रणा हवी.

**सीसीटीव्ही फक्त कॅमेऱ्यांपुरते नको**

शहरातील सीसीटीव्ही यंत्रणा ही गुन्हेगारीविरोधातील महत्त्वाचे साधन ठरू शकते. मात्र कॅमेरे बसविणे हा अंतिम उपाय नाही. त्यांचे नियमित मॉनिटरिंग, फुटेजचे विश्लेषण आणि तपास यंत्रणेला वेळेवर माहिती उपलब्ध होणे तितकेच आवश्यक आहे. शहरातील संवेदनशील चौक, बाजारपेठा, शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातील प्रमुख मार्ग, रात्रीच्या वेळी निर्जन होणारे भाग आणि गुन्हेगारीच्या घटनांची पुनरावृत्ती होणाऱ्या परिसरात प्रभावी निगराणी आवश्यक आहे.

**तरुणांच्या हातात शस्त्र नव्हे, संधी द्या**

**ॲड.संजय रुईकर**
नांदेड

गुन्हेगारी विरोधातील लढा केवळ पोलिसांच्या बळावर जिंकता येणार नाही. बेरोजगारी, व्यसनाधीनता, टोळीयुक्त संस्कृती, सोशल मीडियावरून निर्माण होणारे संघर्ष आणि क्षुल्लक कारणांवरून हिंसाचाराकडे वळण्याची प्रवृत्ती यांचाही गांभीर्याने विचार करावा लागेल. शहरातील तरुणांना क्रीडा, कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, शिक्षण आणि सामाजिक उपक्रमांशी जोडणे ही दीर्घकालीन गुंतवणूक आहे. तरुणांच्या हातातील मोबाइल आणि शस्त्र यांच्यातील अंतर वाढवून शिक्षण आणि रोजगाराच्या संधींचे अंतर कमी करणे आवश्यक आहे.

**शासनाने आकडे नव्हे,परिणाम दाखवावा**

नांदेडकरांना पोलिसांकडून केवळ गुन्हे उघडकीस आणल्याची आकडेवारी नको आहे. त्यांना सुरक्षित रस्ते, सुरक्षित बाजारपेठा आणि आपल्या मुलांना निर्भयपणे बाहेर पाठवता येईल असे वातावरण हवे आहे. अवैध शस्त्रांविरोधात विशेष मोहीम, गुन्हेगारी टोळ्यांवर कायदेशीर कारवाई, संवेदनशील भागात प्रभावी गस्त, गुन्हेगारांच्या नेटवर्कचा तपास, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि नागरिक-पोलिस संवाद या सर्वांचा एकत्रित कृती आराखडा आवश्यक आहे. त्याचवेळी कोणत्याही व्यक्तीवर केवळ संशयाच्या आधारावर अन्याय होऊ नये, कायद्याची प्रक्रिया काटेकोरपणे पाळली जावी आणि नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण केले जावे, हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

**नांदेडची ओळख गुन्हेगारीची नको!**

नांदेडला संतांची, गुरूंची आणि सामाजिक सलोख्याची परंपरा लाभली आहे. या शहराची ओळख खून, टोळीयुद्धे आणि अवैध शस्त्रांमुळे होणे ही नांदेडकरांसाठी दुर्दैवाची बाब ठरेल. गुरुगोविंद सिंगांनी अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. त्या भूमीवर आज नागरिकांना दहशतीत जगावे लागणे ही त्या वारशाची विटंबना आहे.

नांदेडकरांना भीती नको; सुरक्षितता हवी., गुन्हेगारांना मोकळीक नको; कायद्याचा धाक हवा., अवैध शस्त्रांना बाजार नको; कठोर कारवाई हवी., आणि प्रशासनाकडून आश्वासन नको; परिणाम हवा. आज शासनाने या घटनांकडे केवळ स्वतंत्र गुन्हे म्हणून न पाहता त्यामागील व्यापक गुन्हेगारी प्रवृत्तीचा शोध घेण्याची वेळ आली आहे. कारण प्रत्येक वेळी एखादा जीव गेल्यानंतर शोक व्यक्त करण्यापेक्षा एक जीव जाण्यापूर्वी गुन्हा रोखणे हेच खरे प्रशासनाचे यश आहे.नांदेडच्या संयमाची परीक्षा घेऊ नका.गुरुगोविंद सिंगांच्या पावन भूमीला पुन्हा सुरक्षित, निर्भय आणि शांत शहर बनविण्यासाठी आता निर्णायक पाऊल उचलण्याची वेळ आली आहे.

# कु.शितल दुधंबेची मुंबई महापालिकेत शिक्षकपदी निवड



मुदखेड/प्रतिनिधी-महात्मा गांधी विद्यालय, मुदखेड येथील माजी विद्यार्थीनी कु. शितल दुधंबेची मुंबई महापालिकेत माध्यमिक शिक्षकपदी नियुक्ती झाली आहे. तिच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

शितलला बालपणापासूनच वाचनाची प्रचंड आवड होती. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने तिला आई सावित्रीबाई सोबत इतरांची घरकामे करून उदरनिर्वाहासाठी हातभार लावावा लागत होता. मात्र,अनेक अडचणींवर मात करत तिने शिक्षणाची वाट कधीही सोडली नाही.शितलने एम.ए. (मराठी), एम.ए. (इतिहास), बी.एड., एम.एड. या पदव्या संपादन केल्या असून ती सेट व यूजीसी नेट परीक्षाही उत्तीर्ण आहे.सध्या तीचे मराठी विषयात पीएच.डी.चे संशोधन कार्यही सुरू आहे. प्रतिकूल परिस्थितीत एवढे उच्च शिक्षण पूर्ण करून शिक्षकपदाची नोकरी मिळवल्यामुळे विशेष कौतुक होत आहे.तिच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक बाविस्कर सर, तिच्या दहावीच्या वर्गशिक्षिका श्रीमती जोरगुलवार मॅडम, श्रीमती सोनटक्के मॅडम, तसेच माधव कुलकर्णी, संजय राजे, गाढे, नागरगोजे, देशमुख, कोम्पले, बुन्नावार, नन्नवरे सर आणि इतर शिक्षकांनी शितलच्या शैक्षणिक यशाचे व उच्च शैक्षणिक पदव्यांचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटनात्मक बांधणी करा

## भाजपाच्या जिल्हा कार्यकारिणी बैठकीत खा.डॉ.अजित गोपछडे यांचे आवाहन



नांदेड/प्रतिनिधी-भारतीय जनता पार्टी हा शिस्त आणि संस्कारांचा पक्ष म्हणून ओळखला जातो. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये जिल्हाध्यक्षांना महत्त्वाचे स्थान असून, कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पक्षाची ताकद वाढवावी, असे आवाहन राज्यसभा खा.डॉ. अजित गोपछडे यांनी केले.

भाजपा नांदेड दक्षिण जिल्हा कार्यकारिणीची बैठक सोमवारी पार पडली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस प्रदेश उपाध्यक्ष चैतन्य बापू देशमुख, प्रदेश सचिव तथा नांदेड जिल्हा प्रभारी रेखाताई कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, माजी प्रदेश सचिव देविदास राठोड, प्रदेश सदस्य राजेश कुंटूरकर, बालाजी बच्चेवार, सरचिटणीस लक्ष्मणराव ठक्करवाड, माणिकराव लोहगावे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अनिताताई चोंडीकर, आदी उपस्थित होते.प्रारंभी सेवा सप्ताहानिमित्त माणिकराव लोहगावे यांनी माहिती दिली. महाराष्ट्र सरकारने केलेल्या अतुलनीय कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव विजय धोंडगे यांनी मांडला. गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि भारताचे पंतप्रधान म्हणून २५ वर्षाचा कार्यकाल पूर्ण केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा राजकीय प्रवास अनिल पाटील खानापूरकर यांनी मांडला. समरसता अभियानाची माहिती प्राचार्य मनोहर पवार यांनी सादर केली.यावेळी बैठकीला मार्गदर्शन खा. डॉ. गोपछडे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा सर्वांगीण विकास होत असून, महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विविध शासकीय योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू आहे. सरकारच्या योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवून कार्यकर्त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करावी. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका आहेत. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी जो कार्यकर्ता अधिक वेळ देईल, त्याचा पक्ष निश्चितपणे विचार करेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.नांदेड दक्षिण ग्रामीण भागात जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक बांधणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली अधिक सक्रियपणे काम करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भाजपाची सत्ता स्थापन करण्यासाठी आतापासूनच तयारीला लागावे, असे आवाहन डॉ. गोपछडे यांनी केले. बैठकीचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन गंगाप्रसाद यन्नावार यांनी केले तर आभार उत्तम चव्हाण यांनी मानले. याप्रसंगी जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते प्रदेश भाजपाचे माजी सदस्य जिल्हा पदाधिकारी जिल्हा मोर्चा अध्यक्ष मंडळ अध्यक्ष विविध सेलचे जिल्हा संयोजक विधानसभा प्रमुख बीएलए-१, सोशल मीडियाचे मंडळाचे संयोजक आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी-आ.राजेश पवार

नायगाव/प्रतिनिधी-पावसाने दडी मारल्याने नायगाव विधानसभा मतदारसंघातील नायगाव, धर्माबाद आणि उमरी तालुक्यांतील खरीप



पिके करपून वाळत आहेत.परिस्थितीची दखल घेत आ.राजेश पवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

शेतकऱ्यांनी मशागत, बियाणे, खते, औषधे व मजुरीवर मोठा खर्च केला; मात्र पावसाअभावी हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.या गंभीर परिस्थितीची तलाठी, मंडळ अधिकारी आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष शेतशिवारात पाहणी करून नुकसानीची नोंद करण्याची मागणीही त्यांनी केली. दरम्यान, किती गावांमध्ये नुकसान झाले, किती हेक्टर क्षेत्र बाधित आहे, पंचनामे कधी सुरू होणार आणि मदतीसाठी प्रशासनाची कार्यवाही काय आहे, याची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांकडे मागविण्यात आली आहे.शेतकरी संकटात असताना शासनाच्या माध्यमातून त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, असे आ. राजेश पवार यांनी स्पष्ट केले.

# मांडव्यात तुळसीमाळ धारण सोहळा;संतवाणीने व्यसनमुक्तीचा जागर



किनवट/प्रतिनिधी-लौकिक वर्णनाने भाराऊन खुश न होता षडविकार विरहित वर्तनातून नि:सीम परमार्थ करणारे कलियुगामाजी तेच खरे संत. प्रत्येक जीव व्यसनमुक्त आणि विषयमुक्त करुन परमार्थ सिद्धीस नेण्यासाठी संत संगतीसह अचूक मार्गदर्शनाची काळाची गरज बनली आहे, आप-पर भेद,भीड आणि भय विरहित विषय संतांच्या ठायी असतो. म्हणूनच आम्ही तेणे सुखी! म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखी या प्रतिपाद्य अभंगातून ह.भ.प.नारायण महाराज यांनी निरुपण करतांना भक्तांना तुळसीमाळा धारण औचित्य उपक्रम कीर्तनातून प्रबोधन केले.

श्रावण मासातील शेवटच्या सोमवारी (७ सप्टेंबर) किनवट तालुक्यातील मांडवा येथे एकादशीच्या पर्वावर तुळसीमाळा धारण उपक्रमाच्या औचित्यावर कीर्तन सोहळा संपन्न झाला. तेलंगणा राज्यातील महादापूर (मंडळ इच्चोडा) येथील ह.भ.प.नारायण महाराज यांच्या संकल्पनेतील हा सोहळा पार पडला. आमदार भीमराव केराम, ह.भ.प.निवृत्ती महाराज जल्देकर (तेलंगणा), ह.भ.प.रघूनाथ महाराज बोधडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.कलियुगीण काही संत राजद्वाराच्या आश्रयाला धनासाठी जातील पण राजे छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकाराम महाराजांचा काळ आठवा, तुकाराम महाराजांकडे छत्रपती शिवराय धनसंपत्ती घेऊन गेले असता त्यांनी हे आम्हा मृतीकेसमान असल्याचे छत्रपतींना धाडसाने सांगितले. त्यावर छत्रपतींनी विचारले मग आम्ही काय करावे, त्यावर तुकाराम महाराज म्हणाले, तुम्ही मुखाने विठ्ठल विठ्ठल म्हणा व तुळशी माळ धारण करा असा उपदेश केला. छत्रपतींनी तुळशीमाला धारण करून तुकाराम महाराजांचा अनुग्रह घेतल्याचे सुद्धा निरुपणातून नारायण महाराजांनी सांगितले.गळ्यात पवित्र तुळसीमाळ असल्यास माणूस व्यसनमुक्त होऊन आसनयुक्त होऊ शकतो. त्यांच्या संसाराबरोबरच परमार्थ देखील सुखाचा होतो असेही महाराज म्हणाले. महिला, पुरुष, युवक व युवतींनी तुळशीमाला धारण केल्या. तुळसीमाळा धारण उपक्रमाचा तीन वर्षांचा अनिरुद्ध केंद्रे यांनी ताळेबंद मांडला. कार्यक्रमाचे आयोजन समस्त सनातन धर्म सेवा समिती महिला व पुरुष मांडवा तालुका किनवट यांनी केले होते.

---

### पदवीची मुळ प्रत हरवले आहे

माझी कांचन दशरथ कांबळे रा.राहुल कॉलनी, चैतन्यनगर, तरोडा (बु.),नांदेड या नावाची बीएड पदवीची मुळ प्रत विद्यापीठ ते चैतन्यनगर ऑटो प्रवास करीत असतांना हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा.

पत्ता : **कांचन दशरथ कांबळे**
रा.राहुल कॉलनी, चैतन्यनगर, तरोडा (बु.),नांदेड
मो.नं.८४५२९०६२३३

---

### टि.सी.हरवली

माझी कदम शिवदास नारायण या नावाची बि.ए.प्रथम वर्षातील नापासची टि.सी.व इतर कागदपत्रे कुरुळा ते कंधार प्रवास करत असताना कंधार बस्थानक परिसरात हारवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा.

संपर्काचा पत्ता : **कदम शिवदास नारायण**
रा.कारतळा ता.कंधार,जि.नांदेड.
मो.क्रं.९१९४०४७८६६३५

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १२/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार साहेबराव नामदेव सुर्यवंशी रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.दिपक पिराजी गुंडेकर रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव दिपक पिराजी गुंडेकर रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २५/०९/२०१० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १२/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १२/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार साहेबराव नामदेव सुर्यवंशी रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री.दैवदिप पिराजी गुंडेकर रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव दैवदिप पिराजी गुंडेकर रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २२/०९/२०१२ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १२/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १२/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार महेबुब हबीबसाब कासार रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा परविन महेबुब कासार रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव परवीन महेबुब कासार रा.कुरुळा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०३/०२/१९९९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १२/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १२/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार साहेबराव नामदेव सुर्यवंशी रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा नितीशा पिराजी गुंडेकर रा.कंधार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव नितीशा पिराजी गुंडेकर रा.कंधार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २०/०१/२००७ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १२/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १२/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार महेबुब हबीबसाब कासार रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा यास्मीन महेबुब कासार रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव यास्मीन महेबुब कासार रा.कुरुळा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ११/०६/१९९३ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १२/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १२/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार महेबुब हबीबसाब कासार रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा इम्रान महेबुब कासार रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव इम्रान महेबुब कासार रा.कुरुळा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ११/०३/१९९० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०७/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १२/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - १०/०८/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार बालाजी हिरामण गंगावणे रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा श्री. बालाजी हिरामण गंगावणे रा.कुरुळा ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव बालाजी हिरामण गंगावणे रा.कुरुळा ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०५/१९७० या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ३/०८/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- १०/०८/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नों./कावी
दुरध्वनी क्र.२२३-०२४६६ दिनांक - ०३/०७/२०२६

(जन्म मृत्यू शाखा)

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार मोनाली अशोक केंद्रे रा.शेल्लाळी ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मोनाली अशोक केंद्रे रा.शेल्लाळी ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव मोनाली अशोक केंद्रे रा.शेल्लाळी ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०३/०५/२००६ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ३०/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

दिनांक :- ०३/०७/२०२६
स्थळ - कंधार
स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

---

### जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.३०९/२०२६
(CNR No.MHND10-001065-2026)

अर्जदार -

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रुक्मीन भ्र.भगवान टेंभुर्णे | वय-३७ वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | आर्यन पि.भगवान टेंभुर्णे | वय-१७ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ३ | आदित्य पि.भगवान टेंभुर्णे<br>अर्जदार क्र.२ व ३ चे अ.पा.क.<br>आई अर्जदार क्र.१<br>रुक्मीण भ्र.भगवान टेंभुर्णे | वय-१४ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ४ | पंचफुलाबाई भ्र.संभाजी टेंभुर्णे<br>सर्व रा.अंबुलगा,ता.कंधार जि.नांदेड | वय-६३ वर्षे | धंदा-घरकाम |

विरुद्ध गैरअर्जदार -

प्रकरण - अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ चे पती अर्जदार क्र.२ व ३ चे वडील व अर्जदार क्र.४ चा मुलगा नामे भगवान पि.संभाजी टेंभुर्णे हे होते. ते दिनांक ३१/१२/२०२३ रोजी मयत झाले आहेत. अर्जदारांचे म्हणणे आहे की भगवान पि.संभाजी टेंभुर्णे यांचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत भगवान पि.संभाजी टेंभुर्णे यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी तसेच अनुकंपा तत्वावर नौकरीसाठी मयताचे वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत भगवान पि.संभाजी टेंभुर्णे यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहुन आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख-२४/०९/२०२६

आज रोजी दि.२७/०८/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,
कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

---

### जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १३०३/२०२६
राधा व ईतर वि.निरंक
ने.ता.०६/१०/२०२६

अर्जदार:- १. राधा भ्र.गजानन रोंदळे, वय : २४ वर्षे, व्यवसाय: घरकाम, २.अश्विनी पि.गजानन रोंदळे, वय : ०५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण अज्ञान पालनकर्ता अर्जदार क्र.१ राधा भ्र.गजानन रोंदळे दोघे रा.डॉ.आंबेडकर भवन, विठ्ठलनगर, नांदेड, ३. सिताबाई भ्र. साहेबराव रोंदळे, वय : ५५ वर्षे, व्यवसाय : घरकाम, ४. साहेबराव पि. जयवंतराव रोंदळे, वय : ७२ वर्षे, व्यवसाय : मजुरी, दोघे रा. ग्यानमाता शाळेचा रस्ता, विठ्ठलनगर, नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत गजानन पि.साहेबराव रोंदळे यांचा मृत्यु दिनांक ०१/०६/२०२५ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही मयताची मुलगी आहे व अर्जदार क्र.३ व ४ ही मयताचे आई-वडील आहेत. सदरच्या अर्जात अर्जदार यांनी अर्जदार हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ०६/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# माहूरच्या महामार्गावरील प्रलंबित कामांवरुन आमरण उपोषणाचा इशारा

## नवरात्रापूर्वी कामे पूर्ण करण्याची मागणी




माहूर/प्रतिनिधी-माहूर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ अ वरील अनेक विकासकामे गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असून, ती तातडीने पूर्ण करण्यात यावीत, अन्यथा २८ सप्टेंबर पासून आमरण उपोषणास बसण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते राज ठाकूर व अपिल बेलखोडे यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी तहसीलदार अभिजीत जगताप यांना दिले.

धनोडा ते कोठारी या राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण होऊन जवळपास पाच वर्षे उलटली असली तरी माहूर शहरातील अनेक महत्त्वाची कामे अद्याप अपूर्ण आहेत. त्यामुळे नागरिकांसह भाविक व पर्यटकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.इदगाह ते ग्रामीण रुग्णालय या मार्गावरील सर्व पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी हा संपूर्ण परिसर अंधारात बुडतो. तीर्थक्षेत्र असलेल्या माहूरमध्ये पथदिव्यांअभावी अपघातांचा धोका वाढला असून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.दत्त चौक टी-पॉईंट ते ग्रामीण रुग्णालय या मार्गाच्या दोन्ही बाजूंना पेव्हर ब्लॉक बसविण्याचे कामही अपूर्ण आहे. त्यामुळे नागरिकांना चिखल आणि धुळीचा सामना करावा लागत असून पादचाऱ्यांची गैरसोय होत आहे. याचा फटका स्थानिक व्यापाऱ्यांनाही बसत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.महामार्गाच्या मध्यभागी असलेल्या दुभाजकाचे सुशोभीकरणही रखडले आहे. दुभाजकात शोभेची झाडे लावण्यात आलेली नसून संरक्षक जाळीही बसविण्यात आलेली नाही. त्यामुळे रस्ता ओलांडताना अपघातांचा धोका वाढल्याचा आरोप करण्यात आला आहे.पैनगंगा नदीवरील धनोडामाहूर नवीन पूल अद्याप वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नाही. परिणामी नागरिकांना जुन्या पुलावरूनच प्रवास करावा लागत आहे. जुन्या पुलावर मोठमोठे खड्डे पडल्याने अपघाताचा धोका वाढला असून नवीन पूल तातडीने वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी करण्यात आली आहे.माहूर हे श्री रेणुकामाता मंदिर, भगवान दत्तात्रेयांचे जन्मस्थान, अनसूया माता मंदिर, कैलास टेकडी, बाबा सोनापीर दर्गा, शेख फरीद धबधबा, पांडव लेणी, रामगड किल्ला व मातृतीर्थ यांसारख्या धार्मिक आणि पर्यटनस्थळांमुळे प्रसिद्ध आहे. दररोज मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक माहूरला भेट देतात. त्यामुळे नवरात्र महोत्सवापूर्वी महामार्गावरील सर्व प्रलंबित कामे पूर्ण करावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# फुलवळ येथे टोलवसुली विरोधात काँग्रेसचे उद्या आंदोलन



कंधार/प्रतिनिधी-राष्ट्रीय महामार्गावरील फुलवळ येथील पथकर टोल नाक्यावर सुरू असलेली टोलवसुली तात्काळ बंद करावी, या मागणीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने बुधवार, दि.९ सप्टेंबर रोजी स.११ वा.फुलवळ टोल नाक्यावर जोरदार निदर्शने करण्यात येणार आहेत. बहाद्दरपुरा येथील नवीन पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत टोलवसुली स्थगित करण्यात यावी, अशी काँग्रेसची प्रमुख मागणी आहे.


बहाद्दरपुरा येथील पुलाचे काम सुरू असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. रस्ते व पुलाच्या कामामुळे वाहतुकीवर परिणाम होत असताना वाहनधारकांकडून टोलवसुली सुरू ठेवणे अन्यायकारक असल्याचा आरोप काँग्रेसच्या वतीने करण्यात आला आहे. त्यामुळे पुलाचे काम पूर्ण होईपर्यंत फुलवळ येथील टोलवसुली बंद करण्याची मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. निदर्शनानंतर काँग्रेस पक्षाच्या वतीने कंधारचे उपविभागीय अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात येणार आहे. नागरिकांना होणारी गैरसोय दूर करणे तसेच बहाद्दरपुरा पुलाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात येणार आहे.या आंदोलनात कंधार तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सेल व समित्यांचे पदाधिकारी तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय ईश्वरराव भोसीकर, शहराध्यक्ष सय्यद सलीम सय्यद रहीम आणि तालुका सचिव सुरेश कल्लाळीकर यांनी या आंदोलनाचे आवाहन केले आहे.

# माजी उपराष्ट्रपती धनखड यांची वझरा (बु.)ला भेट;येईलवाड कुटुंबीयांचे सांत्वन

## आ.केराम यांच्याशी विविध विषयांवर संवाद

किनवट/प्रतिनिधी-माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड हे ८ सप्टेंबर रोजी किनवट तालुक्यातील वझरा बु.येथील स्व.जगनाथ येईलवाड यांच्या निधनानंतर कुटुंबाच्या सांत्वनपर भेटीसाठी आले होते. दरम्यान किनवटचे आ.भीमराव केराम यांनी धनखड यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. तसेच विविध विषयांवर त्यांच्याशी संवाद साधला, हे विशेष.

मंगळवारी ८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी वझरा बु. येथील येईलवाड कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेतली. सेवानिवृत्त वनपरीक्षेत्र अधिकारी जगन्नाथ येईलवाड यांचे जुलै महिन्यात निधन झाले होते. दार्जिलिंगचे पोलीस अधीक्षक श्रीकांत येईलवाड यांचे ते वडील होते.स्व.जगन्नाथ येईलवाड यांच्या निधनाबद्दल धनखड यांनी येईलवाड कुटुंबीयांशी संवाद साधत शोकसंवेदना व्यक्त केल्या. यावेळी आ.भीमराव केराम यांच्यासह इतर मान्यवर व स्थानिक नागरिक उपस्थित होते. सांत्वनपर भेटीनंतर धनखड हे नागपूर मार्गे परतीच्या प्रवासाला निघाल्याचे सांगण्यात आले.



# उमरखेडच्या महाकाल कावड यात्रेवर काळाचा घाला; एका शिवभक्ताचा जागीच मृत्यू तर १५ जण जखमी

उमरखेड/प्रतिनिधी-श्रद्धा, भक्ती आणि हर हर महादेवच्या जयघोषात माहूर जवळील श्रीक्षेत्र उणकेश्वर येथून निघालेल्या जय श्री महाकाल कावड मंडळाच्या पवित्र यात्रेचा शेवट एवढा भयानक असेल, याची कल्पना कोणालाच नव्हती. श्रावणाच्या सांगतेच्या पवित्र पर्वावर भोलेनाथाच्या भक्तीत लीन होऊन २०-२५ तरुणांचा जथा अनवाणी पायांनी उमरखेडकडे येत होता. देवसरकर मंगल कार्यालयात मुक्कामासाठी निघालेल्या या भक्तिमय वातावरणात अचानक किंकाळ्या आणि रक्ताच्या थारोळ्यांनी जागा घेतली.

६ सप्टेंबरच्या रात्री सुमारे ८ वाजताच्या सुमारास, शहरालगत असलेल्या तुळजापूर-नागपूर राष्ट्रीय महामार्गाच्या ढाणकी रोड बायपासवर मागून भरधाव वेगाने आलेल्या क्रुझर गाडीने कावडधारी भक्तांना जोरदार धडक दिली. एवढेच नाही तर सोबत मदतीसाठी असलेल्या ऑटोलाही या क्रुझरने भीषण धडक दिली. ऑटोमध्ये विश्रांतीसाठी बसलेले आणि खांद्यावर पवित्र कावड घेऊन चालणारे भक्त या अपघातात गंभीर जखमी झाले.या हृदय पिळवटून टाकणाऱ्या अपघातात विशाल दीपक पवार (वय ३४, रा. नागचौक, उमरखेड) या शिवभक्ताचा जागेवरच दुर्दैवी मृत्यू झाला. कावड उचलण्यासाठी गेलेल्या विशालला शेवटी मित्रांच्याच खांद्यावरून जावे लागले, या घटनेने सर्वांचे डोळे पाणावले.या अपघातात अविनाश मासाळकर (वय ३३), विकी ससाने (वय २७), मयूर इंगोले (वय १२), संदीप जाधव (वय ३८), ओम राजेश चवरे (वय २४), बाबू मानखुळकर (वय २८), शिवम गजानन भघाडे (वय १५), शुभम गजानन भघाडे (वय २०), तुषार राजू (वय २०), यशवंत भालेराव (वय १८), रवी जाधव (वय ३०), आकाश ढोरे (वय १७), तुनकेवाड (वय २०) सर्व रा. उमरखेड हे गंभीर व किरकोळ जखमी झाले आहेत. तसेच क्रुझरमधील रोहिणी पडेवार (वय २०, रा. लोहा, जि.नांदेड) ही सुद्धा जखमी झाली आहे. ४ सप्टेंबर रोजी उणकेश्वर येथून निघालेली ही यात्रा उमरखेडच्या जवळ येऊन पोहोचली असताना काळाने घाला घातला. घटनेची माहिती मिळताच उमरखेड पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि क्षणाचाही विलंब न करता रुग्णवाहिका बोलावून जखमींना प्रथम उमरखेडच्या शासकीय उपजिल्हा रुग्णालयात आणि नंतर पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले. या भीषण घटनेची वार्ता शहरात पसरताच घटनास्थळी आणि रुग्णालयात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.




नर्सिंग महाविद्यालयाकडून अनुसुचित जातीच्या शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांकडून निर्धारित शुल्क सोडून अतिरिक्त शुल्क घेवून आर्थिक पिळवणूक केली जात आहे. अशा संबंधित महाविद्यालयावर तात्काळ कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी डॉ.हर्षवर्धन दवणे यांनी सहाय्यक समाज कल्याण आयुक्तालय कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. यावेळी स्वप्निल नरबाग, प्रकाश दिपके, अमोल महिपाळे, संदीप जोंधळे, आतिश ढगे, कुलदीप, अक्षय सोनकांबळे आदी दिसत आहेत.

# पंतप्रधान मोदींच्या कार्यक्रमस्थळी सुरक्षेला खिंडार; बनावट पीएमओ अधिकाऱ्यासह बॉडीगार्ड ताब्यात

मुंबई/प्रतिनिधी-मुंबईतून अतिशय धक्कादायक बाब समोर येत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणीच सुरक्षेचा गंभीर प्रकार समोर आला आहे. वांद्रे-कुर्ला संकुलातील एनएमएसीसी परिसरात पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतलं आहे. यातील एका तरुणाकडे पंतप्रधान कार्यालयाशी संबंधित असल्याचं सांगणारं बनावट ओळखपत्र आढळलं, तर त्याच्यासोबत असलेल्या बॉडीगार्डकडे बंदूक सापडल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली असून पंतप्रधानांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.रोहन पारेख नावाचा २४ वर्षीय तरुण एनएमएसीसी परिसरात फिरत होता. विशेष म्हणजे, तो स्वतःला थेट पीएमओचा अधिकारी असल्याचं सांगत होता. त्याच्याकडे पीएमओचं आयडी कार्डही होतं. मात्र सुरक्षारक्षकांना त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याची चौकशी आणि तपासणी करण्यात आली.तपासणीदरम्यान त्याचं ओळखपत्र बनावट असल्याचं समोर आलं. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी तातडीने त्याला ताब्यात घेतलं. पंतप्रधानांचा कार्यक्रम असल्याने एनएमएसीसी परिसरात आधीपासूनच कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अशा परिस्थितीत बनावट ओळखपत्राच्या आधारे एखादी व्यक्ती कार्यक्रमाच्या आवारात पोहोचल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

# उमरी येथे बुधवारी रंगणार दहीहंडीचा थरार

## हिंदवी पाटील,गुल्लू दादा अन् कुशल बद्रिकेची धमाल

उमरी/प्रतिनिधी-गोकुळाष्टमी आणि श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त उमरी येथे के.डी.बॉस कैलास भाऊ देशमुख गोरठेकर मित्रमंडळाच्या वतीने बुधवार, दि.९ सप्टेंबर रोजी भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील मोंढा मैदानावर सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम रंगणार असून, दहीहंडीच्या थरारासोबत मनोरंजनाचीही मेजवानी उमरीकरांना मिळणार आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून लावणी सम्राज्ञी हिंदवी पाटील, हैदराबादी कॉमेडी स्टार गुल्लू दादा तसेच चला हवा येऊ द्या फेम कुशल बद्रिके उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे दहीहंडी उत्सवाला मनोरंजनाची विशेष रंगत येणार आहे.दहीहंडी फोडण्यासाठी गोविंदा पथकांकडून मानवी मनोरे उभारले जाणार असून, या थरारक सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.या कार्यक्रमास सभापती शिरीष भाऊ देशमुख गोरठेकर, उमरी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष कैलास भाऊ देशमुख, माजी नगरसेवक सुभाषराव देशमुख गोरठेकर, नगराध्यक्षा प्रवीण भाऊ सारडा, शकुंतला भगवान मुदीराज यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोंढा मैदान परिसरात जय्यत तयारी सुरू असून, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोरठेकर मित्रमंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. उत्सवाच्या निमित्ताने उमरी शहरात श्रीकृष्ण जन्मोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

# किनवटचा कापूस तेलंगणात विक्रीला परवानगी द्या ;शेतकऱ्यांची मागणी

किनवट/प्रतिनिधी-आदिवासी बहुल असलेल्या इस्लापूर येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात जिनिंग व प्रेसिंग कारखाना उपलब्ध नसल्याने हमी भावापेक्षा कमी भावात व्यापाऱ्यांच्या माथी कापूस मारावा लागतो. यावर्षीची कोरडा दुष्काळजन्य परिस्थिती पाहता तेलंगणा राज्यातील सीसीआय महाप्रबंधक आणि महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाचे विभागीय व्यवस्थापक यांनी संयुक्त कार्यवाही करुन किनवट तालुक्यातील कापूस तेलंगणात विक्री करण्याचा मार्ग मोकळा करावा यासाठी इस्लापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने पत्रव्यवहार केला आहे.

आगामी २०२६-२७ च्या हंगामासाठी किनवट तालुक्याच्या सिमेलगतच्या तेलंगणा राज्यातील सीसीआय खरेदी केंद्रांवर किनवट तालुक्यातील कापूस विक्रीची परवानगी द्यावी, अशी तमाम शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता इस्लापूर बाजार समितीच्या वतीने तेलंगणा आणि महाराष्ट्र राज्याच्या कापूस महाप्रबंधकांसह आमदार केराम यांच्याकडे पत्रव्यवहार आणि पाठपुरावा चालू केलाय.भारतीय कपास निगम लि. छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक कार्यालयाचे महाप्रबंधकाना कळविले आहे की, तेलंगणा राज्यातील आदिलाबाद, कुबेर, भैंसा आणि सुवर्णा येथील खरेदी केंद्र जवळ आहेत. परंतु किनवट तालुक्यातील कापूस स्विकारला जात नाही. म्हणून तेलंगणातील सीसीआयची परवानगी आवश्यक आहे. ती परवानगी मिळाल्यास शेतकऱ्यांना हमीभाव मिळणार आहे. शिवाय व्यापाऱ्यांकडून केली जाणारी लूटही थांबेल असा विश्वास व्यक्त करण्यात आलाय.

# ॲड.शेख सलीम सौदागर यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

उमरखेड/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अल्पसंख्याक विभागाच्या यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी ॲड. शेख सलीम अब्दुल मजीद सौदागर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रदेशाध्यक्ष अफजल फारूक यांनी २ सप्टेंबर रोजी याबाबतचे नियुक्तीपत्र जारी केले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी व पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी काम करावे, अशा सूचना नियुक्तीपत्रात देण्यात आल्या आहेत.यवतमाळ जिल्ह्यात अल्पसंख्याक विभागाची संघटनात्मक बांधणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल इनायत उल्ला खान, राजू भैय्या जयस्वाल, प्रदीप पाटील देवसरकर, मुक्तार भाई, युसुफ सौदागर, जुबेर खान यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे.

# मौ.संगुचीवाडी येथील हॉटेलात चोरी

नांदेड/प्रतिनिधी-मौ.संगुचीवाडी ता.लोहा येथील जयमहाराष्ट्र बार ॲण्ड रेस्टारंट या हॉटेलचे रविवारी रात्री अज्ञात चोरट्यांनी दरवाजाचे कुलूप तोडून हॉटेलमधील १ लाख ८३ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी चोरुन नेला आहे. याप्रकरणी हॉटेल मालक गणेश कोटेवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लोहा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरुन

## कुणबी प्रमाणपत्र देण्याची...

यांनी मार्गदर्शन केले.हैदराबाद गॅझेटच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीत शासन निर्णयातील तरतुदींचा विचार करून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करावी. तसेच ग्राम व तालुका पातळीवरील यंत्रणांनी अर्जदारांना आवश्यक नोंदी उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचनाही त्यांनी केल्या.विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये संबंधित प्रकरणांची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. उपलब्ध नोंदींचा प्रभावी वापर करून पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.बैठकीत विभागातील जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील प्रमाणपत्र प्रक्रियेची सद्यस्थिती आणि करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

## माहूर तालुक्यात पावसाच्या खंडाने...

कामांसाठी ट्रॅक्टरचा वापर वाढल्याने गेल्या काही वर्षांत घरोघरी बैलांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे अनेक कुटुंबांत प्रत्यक्ष बैलांची पूजा करण्याऐवजी मातीच्या बैलांची पूजा करून पोळ्याची परंपरा जपली जात आहे. अशा परिस्थितीत बाजारात सजावटीचे साहित्य उपलब्ध असले तरी खरेदीचा उत्साह मात्र मंदावला आहे. पावसाची प्रतीक्षा आणि हातातील पैशांची चणचण यामुळे यंदाच्या पोळ्याचा सण शेतकऱ्यांसाठी उत्साहापेक्षा चिंतेचा ठरत असल्याचे चित्र महागावच्या बाजारपेठेत दिसून येत आहे.

# धनंज येथील नागरबाई धडेकर यांचे निधन

नायगाव/प्रतिनिधी-धनंज येथील नागरबाई केरबा धडेकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यावर धनंज येथील गोदावरी नदीजवळ अंत्यसंस्कार करण्यात आले.



निधनाची वार्ता समजताच गावकऱ्यांनी धडेकर कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत रात्र जागुन काढली. अंत्यविधीपर्यंत गावकऱ्यांनी खंबीरपणे उपस्थित राहून आधार दिला. अंत्यसंस्कारावेळी ग्रामस्थ, पत्रकार, नातेवाईक व मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी पत्रकार माधव पवार यांनी भावस्पर्शी गीत सादर करून नागरबाई धडेकर यांना श्रद्धांजली अर्पण केली. दुःखाच्या प्रसंगी जात-पात विसरून एकमेकांच्या पाठीशी उभे राहण्याची माणुसकी धनंज येथे अनुभवायला मिळाली.नागरबाई धडेकर यांच्या पश्चात त्यांचे पती, तीन विवाहित मुले, एक विवाहित मुलगी, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# जिल्ह्यात शस्त्र व जमावबंदी आदेश लागू

नांदेड/प्रतिनिधी-आगामी सण, उत्सव, आंदोलने, मोर्चे तसेच विविध कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये नांदेड जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे. अपर जिल्हादंडाधिकारी किरण अंबेकर यांनी हा आदेश जारी केला असून दि.९ सप्टेंबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. २३ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हा आदेश लागू राहणार आहे.

या कालावधीत नांदेड जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणी किंवा त्याच्या आसपास पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा वस्तू बाळगण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. दाहक अथवा स्फोटक पदार्थ बाळगणे किंवा वाहून नेणे, दगड अथवा इतर क्षेपणास्त्रे तसेच ती फेकण्यासाठी वापरली जाणारी साधने जवळ बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे यासही मनाई करण्यात आली आहे. व्यक्ती, प्रेते, आकृती किंवा त्यांच्या प्रतिमांचे प्रदर्शन तसेच सार्वजनिकरीत्या घोषणा देणे, गाणी म्हणणे किंवा वाद्ये वाजविण्यासही प्रतिबंध राहणार आहे. दि.९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना करण्याच्या मागणीसाठी आंदोलन होणार आहे. दि.१० सप्टेंबर रोजी बैलपोळा सणाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात बैलजोडी मंदिरात फिरविण्याच्या मानाच्या कारणावरून वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.तसेच दि.१० ते १५ सप्टेंबरदरम्यान अनुसूचित जाती गटातील आरक्षणाच्या अ, ब, क, ड उपवर्गीकरणाची मागणी करण्यासाठी महा सत्याग्रह आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १३ सप्टेंबर रोजी नांदेड शहरात जनआक्रोश मोर्चाचेही आयोजन करण्यात येणार आहे.दि. १४ सप्टेंबर रोजी श्री गणेश चतुर्थीनिमित्त गणेशमूर्तींची स्थापना, विविध धार्मिक कार्यक्रम, सजावट व अन्नदानाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर होणार आहेत. दि. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन तसेच गौरीपूजनाच्या पार्श्वभूमीवर विविध कार्यक्रम व मिरवणुका होणार आहेत. या सर्व बाबींचा विचार करून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४